PCCOE/Exam/2026-27/312

Pimpri Chinchwad Education Trust's

# Pimpri Chinchwad College of Engineering

(An Autonomous Institute)

Affiliated to Savitribai Phule Pune University(SPPU)

दिनांक:-01/10/2026

प्रति,

मा. विभागप्रमुख,

पिंपरी चिंचवड अभियांत्रिकी महाविद्यालय

निगडी पुणे-411044.

विषय:- सत्रपूर्तता संपलेल्या विद्यार्थ्यांना एका शैक्षणिक वर्षासाठी परीक्षेस बसण्याबाबत.

संदर्भ:- परीक्षा/समन्वय/1309 दिनांक 29/09/2026

सर,

उपरोक्त विषयासंदर्भात या परिपत्रकाव्दारे कळविण्यात येते कि, महाविद्यालयाच्या B.Tech Rules and Regulation V2.4 या संर्दभाप्रमाणे ज्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष 2026-27 मध्ये सत्रपूर्तता कालावधी पुर्ण झालेला आहे अशा विद्यार्थ्यांना शेवटची संधी म्हणुन शैक्षणिक वर्ष 2026-27 मधील Oct/Nov 2026 and April/May 2027 या परीक्षांना रितसर बसण्यासाठी विद्यार्थ्यांनी लेखी निवेदन महाविद्यालयास करणे बंधनकारक आहे. सदर अर्जावर B.Tech Rules and Regulation V2.4 याच्या अनुषंगाने विचार करून त्याबाबत निर्णय घेतला जाईल.

मा. विभागप्रमुख यांना विनंती की, सदर परिपत्रकाचा आशय सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणुन दयावा व विद्यार्थी या संधीपासुन वंचित राहणार नाही यावी काळजी घ्यावी.

Pimpri Chinchwad College of Engineering, An Autonomous Institute, EXAM Section, Nigdi, Pune-44

आपला विश्वासु

डॉ. ताडे सुनिल लक्ष्मण

परिक्षा नियंत्रक

Copy To:

1. Director, Deputy Director, Registrar
2. Deans: Academics
3. Program Head: MECH / COMP / E&TC / IT / CIVIL / CSE(AIML)/ AS&H / MCA / B.Voc
4. Faculty & Staff members as mention above.
5. Office Copy.

परीक्षा समन्वय कक्ष
परीक्षा विभाग
गणेशखिंड, पुणे ४११ ००७.
दूरध्वनी क्र.: ०२०-२५६२१४४०
ई-मेल आयडी:
ar.coordination@pun.unipune.ac.in
coe@unipune.ac.in
संकेतस्थळ : www.unipune.ac.in

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY

(Formerly University of Pune)

Exam Co-ordination Section
Examination Department
Ganeshkhind, Pune 411 007.
Phone No.: 020-25621440
E-mail Id.:
ar.coordination@pun.unipune.ac.in
coe@unipune.ac.in
Website: www.unipune.ac.in

संदर्भ क्र. परीक्षा/समन्वय/ 1309                                                                 दिनांक : २१/ ९ /२०२६

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक
सर्व संबंधित संलग्न महाविद्यालये, स्वायत्त महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था
(पुणे, अहिल्यानगर, नाशिक जिल्हा आणि दादरा-नगर हवेली)

**विषय:** सत्रपूर्तता संपलेल्या विद्यार्थ्यांना एका शैक्षणिक वर्षासाठी हिवाळी सत्र २०२६ आणि उन्हाळी सत्र २०२७ परीक्षेस बसण्यासाठी परवानगी देत असल्याबाबत. (अनुषेश असलेल्या विद्यार्थ्यांसाठी).

**संदर्भ:** १. परिपत्रक क्र. २०९/२०२६, जा.क्र. सीबी/३४, दिनांक २१.०९.२०२६.
२. परिपत्रक क्र. २१०/२०२६, जा.क्र. सीबी/३३, दिनांक २१.०९.२०२६.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषय संदर्भीय पत्रातील आशय लक्षात घेता सर्व संबंधितांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, ज्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वर्ष २०२५–२६ मध्ये संबंधित अभ्यासक्रमाचा N+2 कालावधी पुर्ण झाला आहे व शैक्षणिक वर्ष २०२६–२७ मध्ये अंतिम वर्षात प्रवेशास पात्र आहेत, परंतु N+2 कालावधी पुर्ण झाल्याने प्रवेशित नाहीत, अशा विद्यार्थ्यांना UGC च्या मार्गदर्शक तत्वानुसार शैक्षणिक वर्ष २०२६–२७ मध्ये अंतिम वर्षात प्रवेशाची संधी देण्यास मान्यता देण्यात आली आहे.

महाविद्यालयांनी शैक्षणिक कामकाज पुर्ण करून विहीत वेळेत विद्यार्थ्यांचे अर्ज **Inward** करावेत. तसेच ज्या विद्यार्थ्यांचा अंतिम वर्षात अनुषेश (बॅकलॉग) आहे. तसेच ज्या विद्यार्थ्यांचा अंतिम व अंतिम पूर्व वर्षात अनुषेश (बॅकलॉग) आहे व ज्यांची सोडवणूक निश्चित केलेल्या विहीत कालावधीमध्ये पूर्ण होईल अशा सर्व विद्यार्थ्यांना एका शैक्षणिक वर्षासाठी परीक्षेस बसण्यास संधी देण्याच्या दृष्टीने शेवटच्या दोन संधी (हिवाळी सत्र २०२६ आणि उन्हाळी सत्र २०२७) देण्यात येत आहे. तथापी सदरची मुभा/सवलत ही फक्त अंतिम वर्ष व अंतिमपूर्व वर्षातील ज्या विद्यार्थ्यांचे अनुषेश (बॅकलॉग) राहीले असतील अशाच विद्यार्थ्यांना लागू राहील. या संधी अंतर्गत नवीन किंवा पुर्नप्रवेश देता येणार नाहीत.

हिवाळी सत्र २०२६ आणि उन्हाळी सत्र २०२७ परीक्षा आयोजित करतांना नियमित अनुशेष विद्यार्थ्यांसाठी ज्या परीक्षा आयोजित केल्या जातात, तेवढयाच परीक्षा आयोजित करण्यात येतील (कोणताही पॅटर्न असेल तर त्या सर्व परीक्षा एकत्र एकाच वेळापत्रकानुसार घेण्यात येतील) व स. परीक्षांना प्रविष्ट होण्यास, त्यांनी शिकलेल्या किंवा समकक्ष विषयान्वये परीक्षेस बसण्याची संधी देण्यात येणार आहे. (उदा: सध्या २०२४ पॅटर्न प्रमाणे नियमित व यापूर्वीच्या लगतच्या पॅटर्नप्रमाणे ज्या अनुशेष परीक्षा घेण्यात येत असतील अशा परीक्षा म्हणजेच २०२४ पॅटर्नच्या लगतचे पॅटर्न)

मा. विभागप्रमुख/प्राचार्य/संचालक, संबंधित विद्यापीठीय शैक्षणिक विभाग/संबंधित सर्व संबंधित संलग्न महाविद्यालये तसेच स्वायत्त महाविद्यालये/सर्व संबंधित संलग्न मान्यताप्राप्त संस्था यांना विनंती की, सदर परिपत्रकाचा आशय सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावा व विद्यार्थी या संधीपासुन वंचित राहणार नाहीत याची काळजी घ्यावी.

Submitted to Hon. Director sir for information & further guidance pl.

Dr. Tade, CoE

30/9/26

प्रा.(डॉ.) राजेंद्र तळवारे
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ